स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक **19–09–2011** रोजी दुपारी **03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 3. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 4. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 5. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 6. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 7. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 8. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 9. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 10. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 11. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 12. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 13. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 14. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 2. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर. झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 75</u> :– हनुमाननगर झोन क्र. 3 मधील सन 2011–12 च्या अंदाजपत्रकात पद क्र. 367 (टार पॅचेस) अंतर्गत झोन करिता ठेवलेल्या रु. 10 लक्ष मधून पद क्र. 460 (माध्यमिक शाळा इमारत दुरुस्ती) जुने देणे मध्ये रु. 1 लक्ष व पद क्र. 676 (रस्त्यांची सुधारणा व निर्माण फुटपाथ अंतर्भुत) मध्ये रु. 3 लक्ष तसेच पद क्र. 637 (विहीरीवर जाळया तयार करुन बसविणे) मधुन पद क्र. 716 (म.रा.वि.वि.कं. विद्युत खांबावर 50/70 वॅटचे सोडीयम दिवे फिटिंग करणे)मध्ये रु. 1 लक्ष वळती करण्यास प्रभाग समिती ठराव क्र. 152, दिनांक 16.08.2011 अनव्ये मंजुरी प्रदान केली असून या वळती (पुनर्विनियोजन) करण्याच्या प्रस्तावास परिशिष्ट–अ स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 76</u> :– नागपूर शहरातील रस्त्यावरील खड्डयाची दूरुस्ती व पॅचेस करण्याचे हॉट मिक्स प्लान्ट द्वारे परंपरागत पध्दतीने हॉट मिक्स ॲशफाल्ट कॉक्रीट ( B.M.& S.D.B.C.) वापरुन करण्यात येते. पावसाळयामध्ये उष्ण मिश्रीत डांबरचे कॉक्रीट वापरुन खड्डे दूरुस्ती करणे तांत्रीकदुष्टया शक्य होत नाही व ते योग्यही नसल्यामूळे Emulsion व खडीचे मिश्रण तयार करुण थंड मिश्रीत ग्राउटीगं पध्दतीने खड्डे भरण्यात येतात. Emulsion मध्ये डांबराचे प्रमाण कमी असल्यामूळे थंड मिश्रीत ग्राउटीगं पध्दतीने दूरुस्त केलेले खड्डे फार काळ टिकूण राहात नाही. सततच्या वाहतुकीमुळे पावसाळयात अशाप्रकारे दुरूस्ती केलेले खड्डे पून्हा निखळतात व पून्हा दूरूस्ती करणे भाग पडते. परंपरागत पध्दतीवर मात करुण आधूनिक पध्दतीचा वापर केल्यास कमीवेळात जास्त प्रमाणात खड्डे भरणे शक्य होईल त्यामुळे रस्ते वाहतुकी योग्य ठेवण्यास मदत होईल.

आधूनिक पध्दतीने खड्डे बुझविण्याचे तंत्रज्ञान विकसित झालेले असून STG infrastructure या सेल्स कंपनीने जेटपॅचर "JETPATCHER" नावाच्या आधूनिक पध्दतीने खड्डे बुझविण्याचे यंत्र बाजारात आणलेले आहे. सद्यस्थीतीत खड्डे बुझविण्याचे काम हॉट मिक्स प्लान्टद्वारे करण्यात येते. JETPATCHER द्वारे खड्डे बुझविण्याचे काम हाती घेतल्यास त्याची अनुकूलता तपासणे आवश्यक आहे.

हॉट मिक्स प्लान्टची व. JETPATCHER ची तुलनात्मक ठळक वैशिष्टे याप्रमाणे आहे.

| **JETPATCHER** मशिन द्वारे खड्डे दूरूस्ती | हॉट मिक्स प्लान्टद्वारे खड्डे दूरूस्ती |
|---|---|
| 1. फक्त Emulsion मिश्रीत A.C. & S.D.B.C चा वापर करुण खड्डे बुझविण्याचे काम शक्य आहे. | 1. B.M. & S.D.B.C दोन्हीचा वापर करुण खड्डे बुझविण्याचे काम शक्य आहे. |

| | |
|---|---|
| 2. काम करण्याची पात्रता (output) 3 cum प्रति तास याप्रमाणे आहे.<br><br>3. 100मिमि (4 इंच) खोलीपर्यतचे खड्डे बुझविल्या जावू शकतात. त्यापेक्षा जास्त खोलीचे खड्डे बुझविण्याची कोणतीही यांत्रीक व्यवस्था नाही.<br>4. JETPATCHER मशिन फक्त Emulsion वापरुण थंड मिश्रीत कॉक्रीट करीता उपयोगी आहे.<br><br>5. A.C.& S.D.B.C चा दर रु.14404.71 / प्रति घन मीटर आहे. | 2.पावसाळयात हॉट मिक्स प्लान्टद्वारे Emulsion वापरून manually काम करणे तूलनात्मक दुष्टया कमी आहे.<br>3. कोणत्याही स्वरूपाचे / खोलीपर्यतचे खड्डे, वेगवेगळया थरामध्ये भरल्या जावू शकतात.<br><br>4. उष्ण मिश्रीत कॉक्रीट व थंड मिश्रीत कॉक्रीट दोन्हीचा वापर रस्त्यावरील खडडे बुझविण्याकरीता करता येते.<br><br>5. S.D.B.C चा दर रु. 7961 / प्रति घन मीटर व B.M चा दर रु.4976 / प्रति घन मीटर याप्रमाणे आहे. |

वरील तूलनात्मक तक्त्यावरुण स्पष्टपणे लक्षात येते कि JETPATCHER मशिन द्वारे कामाचे दर हे हॉट मिक्स प्लान्टद्वारे करण्यात येणा—या कामापेक्षा निश्चीतच जास्त आहेत.

तथापी, JETPATCHER चे मूख्य वैशिष्ट असे कि पावसाळयाच्या दिवसात खड्डयामध्ये पाणी भरलेले असते खड्डयातुन पाणी काढणे, खड्डा Dry करणे, खड्डयातील Loose material बाहेर काढणे इत्यादी व्यवस्था JETPATCHER मशिनद्वारे करण्यात येते. अश्याप्रकारे खड्डा दूरूस्तीसाठी पुर्णपणे तयार करुण त्यामध्ये Emulsion वापरुन थंड मिश्रीत कॉक्रीट द्वारे खड्डयाची दुरुस्ती केली जाते. दुरुस्त केलेले खड्डे सुमारे एक वर्षापर्यत टिकूण राहण्याची सदर कपंनीने हमी दिलेली आहे. पावसाळयात रस्त्यावर खड्डे पडण्याचे प्रमाण जास्त असल्यामूळे खड्डंयामूळे कोणतीही अनुचीत घटना घडूनये करीता खड्डे बुझविण्याची कार्यवाही त्वरीत / वेगाने होण्याच्या दूष्टीने पाउल उचलणे आवश्यक ठरते हयाकरीता हॉट मिक्स प्लॅन्टच्या तुलनेत एक प्रभावी पर्याय म्हणून JETPATCHER मशिनचा विचार करता येवू शकंतो.

हॉट मिक्स प्लॅन्टद्वारे खड्डे बुझविण्याच्या प्रक्रीये मध्ये मनुष्यबळाचा वापर करुण काम करण्यात येते. हॉट मिक्स प्लॉन्टद्वारे पावसाळयाच्या दिवसात Emulsion चा वापर करुण grouting पध्दतीने खड्डे बुझविण्याचे काम करण्यात येते. खड्डयातुन पाणी काढणे, खड्डा Dry करणे , खड्डेयातील Loose material काढणे खड्डा कामाकरीता योग्य करण्याची यंत्रणा म.न.पा. मघ्ये अस्तीत्वात नसल्यामुळे तातडीने बुझविण्यात आलेले खड्डे फार काळ टिकूण राहत नाही त्यामूळे अश्या खड्डंयाची दुरुस्ती अशा पून्हा करणे क्रमप्राप्त ठरते परिणामी, खड्डे दूरूस्ती वरील खर्च वाढत जाते.

JETPATCHER मशिन द्वारे खड्डे बुझविणे ही एक आघूनिक पध्दती असून संपूर्ण काम मशिन द्वारे करण्यात येणार आहे. शिवाय यामूळे म.न.पा.च्या कामात एका नविन तंत्रज्ञानाची भर पडणार आहे. म.न.पा.च्या इतिहासातील ही एक महत्वाची बाब असून शहरातील नागरीकांना एक आधूनिक तंत्रज्ञान वापरुण, खड्डे दूरूस्ती पोटी केलेल्या कामाची प्रचिती येणार आहे.

JETPATCHER मशिन द्वारे शहरातील रस्त्यावरील खड्डे बुझविणे ही एक स्वागतार्ह बाब असून एक महत्वाचे पाउल या निमित्याने म.न.पा.त पडणार आहे. करीता JETPATCHER मशिन द्वारे करावयाच्या कामाची अनूकूलता चाचणी प्रायोगीक तत्वावर करण्यास हरकत नसावी. तसेच सदरचे काम जेटपॅचर मशीन ने करावयाचे असल्यास योग्य ते दरप्रृथःकरण करून दरनिश्चित करावे लागेल व त्यासाठीच्या अंदाजपत्रकास स्वतंत्र मान्यता घ्यावी लागेल.

हे विशीष्ट स्वरूपाचे काम असल्यामुळे स्वतंत्र पणे प्रावधानाची व्यवस्था करावी लागेल. सदर चे काम मशीन द्वारे अत्यावश्यक वेळेस, फक्त पावसाळयामध्ये करणे योग्य राहील.

वरिल प्रमाणे प्रस्तावास तत्वतः मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 77</u> :– टेलीकॉम नगर गार्डन, रींग रोड, नागपूर येथे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 13,50,545/– (तेरा लक्ष पन्नास हजार पाचशे पंचेचाळीस) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ – 1000/सं. क्र. – 241/प्र.क्र. 13/पा.पु. –21, मंत्रालय, मुंबई –32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑरगेनायजेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेकडुन शासन निर्णय क्र. ग.व.सु./1088/सी.आर. 2018 भा.ग.– 2/का. – 7 मंत्रालय मुंबई – 32 दि. 26 ऑगस्ट 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथिल करून प्राकलनिय दर अधिक 15% कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देऊन त्याचे मार्फत ''पैसे द्या व वापरा तत्वावर'' दिर्घ मुदतीकरिता सार्वजनिक शौचालये बांधणे व त्यातील सुविधांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 78</u> :– मेडीकल कॉलेज प्रिमाईसेस, नागपूर येथे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 22,85,976/– (बावीस लक्ष पंच्याशी हजार नऊशे छहात्तर) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ – 1000/सं. क्र. – 241/प्र.क्र. 13/पा.पु. –21, मंत्रालय, मुंबई –32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑरगेनायजेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेकडुन शासन निर्णय क्र. ग.व.सु./1088/सी.आर. 2018 भा.ग.–2/का. – 7 मंत्रालय मुंबई – 32 दि. 26 ऑगस्ट 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथिल

करून प्राकलनिय दर अधिक 15% कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देऊन त्याचे मार्फत ''पैसे द्या व वापरा तत्वावर'' दिर्घ मुदतीकरिता सार्वजनिक शौचालये बांधणे व त्यातील सुविधांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 79</u> :– वर्धा रोड, ऑक्ट्राय नाका, नागपूर येथे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 27,75,500/– (सत्तावीस लक्ष पंच्याहत्तर हजार पाचशे) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ – 1000/सं. क्र. – 241/प्र.क्र. 13/पा.पु. –21, मंत्रालय, मुंबई –32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑरगेनायजेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेकडुन शासन निर्णय क्र. ग.व.सु./1088/सी.आर. 2018 भा.ग.– 2/का. – 7 मंत्रालय मुंबई – 32 दि. 26 ऑगस्ट 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथिल करून प्राकलनिय दर अधिक 15% कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देऊन त्याचे मार्फत ''पैसे द्या व वापरा तत्वावर'' दिर्घ मुदतीकरिता सार्वजनिक शौचालये बांधणे व त्यातील सुविधांची देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 80</u> :– नागपूर महानगरपालिका, जलप्रदाय विभागाद्वारे शहरात टॅकरद्वारे पाणीपुरवठा करण्याऱ्या वाहनांमध्ये GPS/GIS based fleet locator (Vehicle Tracking System Unit) सद्या अस्तित्वात असलेल्या मंजूर कंत्राटासंदर्भात खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन

1. स़द्य सुरु असलेल्या कंत्राटाअंतर्गत रु. 1629/– प्रति महिना मंजूर दरावर कंत्राटदारास पुढील एक वर्षाकरीता किंवा नविन निविदा मंजूर होईस्तोवर जो कालावधी कमी असेल त्या कालावधीपर्यत मुदतवाढ मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. एक वर्षाकरीता रु. 48,87,000/– च्या वार्षीक खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. वरील एक वर्षाच्या मुदतवाढीसह या कंत्राटाच्या एकुण रु. 1,24,06,464/– च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. हे काम मंजूर एजेन्सी मे. ईशा एंटरप्रायजेस मार्फत करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 81</u> :– महादुला रॉ वॉटर पंपींग स्टेशनच्या operation/ Maintenance च्या जून्या कंत्राटास दि. 01.04.2011 ते 10.08.11 पर्यंत मुदतवाढ देण्यास व या अतिरिक्त कालावधीकरीता मंजूर दराने लागणाऱ्या रु. 9,28,980/– चे खर्चासहीत एकूण रु. 86,46,667/– चे खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 82</u> :– वॉर्ड क्र. 28, नाग नदीवरील भरतवाडा गांवा जवळील जुना पूल तोडून नविन पूल बांधकामास्तव रु. 2,15,31,004/– रकमेच्या सुधारित प्राकलनास मंजूरी प्रदान करुन, सदरील कामांचे कंत्राटदार मे. अबरार अहमद, यांचे मंजूर म्हणजेच प्राकलनीय दरावर सन 2011–12 मध्ये उपलब्ध प्रावधान रकमेपर्यंत कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 83</u> :– शासन निर्णय क्र. नामपा–2308–680–प्र.क्र.–358–नवि–26, दिनांक 01.04.2009 व शासन निर्णय क्र. नामपा–2308–680–प्र.क्र.–358–नवि– 26, दिनांक 08.09.2010 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमशः नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसूली उपविधी 2009 व दुरुस्ती उपविधी 2010 च्या कलम 56 (ब) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत आयुक्त, म.न.पा. यांनी सोबत सहपत्र –1 वर जोडलेल्या आदेश क्रमांक एम.सी./137/2011,दि. 12.08.11 अन्वये मंजूर केलेले व दिनांक 01.07.2011 पासून लागु केलेल्या सुधारीत दरांची नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर शहर पाणी पट्टी दर मुल्यांकन, वसुली उपविधी 2009 व दुरुस्ती उपविधी 2010 च्या कलम 56 (ब) अन्वये प्राप्त अधिकारानुसार आयुक्त, म.न.पा. यांनी सुधारीत दर दिनांक 12.08.2011 ला लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

परंतु स्थायी समितीच्या असे निदर्शनास आले की, ठराव क्र. 148 दिनांक 22.01. 2008 प्रमाणे ज्या ठरावास म.न.पा. सभागृहाने सुधारणा व दरवाढीस एकमताने मंजूरी प्रदान केली त्या प्रमाणे शासनाने त्यास मंजूरी प्रदान केली नाही व प्रस्तावित उपविधीत फेरबदल करुन उपविधी कायम केली.

म.न.पा. सभागृहाने घेतलेल्या निर्णया प्रमाणे दिनांक 31.03.2012 पर्यंत दर वाढ करण्यांत येऊ नये असे धोरणात्मक निर्णय झाला. 56 (ब) मधील फेरबदल हा नागपूरातील नागरिकांच्या हितात नाही असे स्थायी समितीस वाटते. जरी हया आयुक्तांच्या निर्णयाची नोंद घेण्यास हा विषय स्थायी समितीस पाठविला असेल तरी सुध्दा मुळ म.न.पा. ठरावातील धोरणात्मक झालेल्या बदलाची माहिती म.न.पा. सभागृहाला कळविणे गरजेचे आहे असे स्थायी समितीचे मत असल्यामुळे हा विषय म.न. पा. सभागृहाच्या माहितीस व योग्य निर्णय घेण्यास्तव पाठविण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

**<u>ठराव क्रमांक 84</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

# स्थायी समिती दिनांक 19.09.2011 च्या ठराव क्र. 75 चे परिशिष्ट 'अ'

सन 2011–12 झोनल अंदाजपत्रकाचे पदाअंतर्गत राशीचे पुनर्विनियोजन करण्याबाबतचे विवरण

| अ. क्र. | ज्या पदामधुन वळती करावयाची आहे तो पद क्र. | एकुण प्रावधान | झालेला खर्च | ज्या पदात वळती करावयाचे आहे तो पद क्र. | वळती करण्यात येणारी राशी | ज्या पदातुन वळती करावयाची त्यातुन वळती केल्यानंतर शिल्लक राशी | ज्या पदात वळती करावयाची आहे त्याचे एकुण प्रावधान | | पुनर्विनियोजन केल्या नंतर होणारी राशी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | पद क्र | राशी | |
| 1 | 367 | 16 लक्ष | 0 | 460 | 1 लक्ष | 12 लक्ष | 460 | 0 | 1 लक्ष |
| 2 | | | | 676 | 3 लक्ष | | 676 | 292.30 लक्ष | 295.30 लक्ष |
| 3 | 637 | 1 लक्ष | 0 | 716 | 1 लक्ष | 0 | 716 | 17 लक्ष | 18 लक्ष |

हस्ता/– राजेश कराडे<br>
हनुमाननगर झोन क्र.3<br>
महानगरपालिका, नागपूर.